Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

संशोधनात्मक लेख

# मुंबईतील माध्यमिक शाळेच्या शिक्षकांमधील संस्थात्मक न्याय, व्यवसाय समाधान आणि व्यावसायिक बांधिलकी यांच्या मधील सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. सिबील थॉमस,**
**सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विभाग,**
**शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ**

**कांबळे कविता रामचंद्र,**
**पीएच.डी. विद्यार्थी,**
**मुंबई विद्यापीठ.**

**प्रस्तापना**

शिक्षणप्रक्रिया ही राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय विकासाशी निगडित आहे.राष्ट्रीय उत्पन्नाचा दर व राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी शिक्षणप्रक्रिया मोलाची भूमिका निभावताना दिसत आहे.परंतु शिक्षणप्रक्रिया हे साध्य करण्यासाठी कटीबध्द असणाया शिक्षकांवर अवलंबून असते.शिक्षकांनी व्यवसायाशी बांधील राहून प्रामाणिकपणे जर काम केले नाही तर राष्ट्रीय विकासामध्ये अडथळा येऊ शकतो.शिक्षकांनी उत्कृष्टपणे व

परिणामकतेने काम केले तर आपण आपल्या राष्ट्राच्या भवितव्याविषयी आत्मविश्वासाने बोलू शकतो.म्हणुन शिक्षणप्रक्रियेत शिक्षकांच्या महत्त्वाला, त्यांच्या गरजांना अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे.

शिक्षकांची व्यवसायाप्रतीची ओळख ही मुख्यतः त्यांच्या व्यवसायातील समाधानावरून समजते की जे त्यांना या व्यवसायातून मिळते.अनेक संशोधनावरून असे लक्षात येते की,जेव्हा व्यक्ती त्याच्या कामामध्ये समाधानी असते तेव्हा फक्त त्यालाच फायदा होत नाही तर तो ज्या संस्थेत, ज्या ठिकाणी काम करतो त्यांना सुध्दा त्याचा फायदा होत असतो. व्यवसाय समाधान हे त्या व्यक्तीचे कार्यमान उंचावते.त्याचबरोबर त्याच्या व्यक्तिगत कामाच्या स्वरूपाची परिणामकारकता देखील वाढविते म्हणून व्यवसाय समाधान ही संकल्पना प्रत्येक क्षेत्राशी निगडीत असून तिचा प्रत्येक ठिकाणी विचार केला गेला पाहिजे.

The Education commission (1964-65)obseverd ‘of all different factors which influence the quality of education and it’s contribution to materal development the quality of education competence and character of teacher are undouteally the most significant.

एवढेच नव्हे तर कोणत्याही संस्थेमध्ये तेथील कामाच्या स्वरूपानुसार जे काही उत्पादन आणि इतर कार्यालयीन कामे असतात ती त्या ठीकाणी कामे करणाया लोकांवर अवलंबून असतात.संस्थेमध्ये काम करणाया व्यक्ती हया संस्थेच्या प्रगतीचे कारक असतात.उत्पादन वाढीसाठी तेथील काम करणाया लोकांच्या सहकार्याची आवश्यकता असते.तसेच कार्यालयीन कामे देखील व्यक्तीच्या सहकार्यानेच व्यवस्थितपूर्ण होऊ शकतात.

त्यामुळे संस्थेची आर्थिक प्रगती होते.त्यासाठी काम कारणाया व्यक्तीच्या गरजा स्पूर्ण होणे आवश्यक असतात.उदा चागंला पगार, कामाचे तास, बढती, आरोग्य विषयक सुविधा, करमणूकीची साधने, जेवणासाठी वेळ, विश्रांतीसाठी वेळ, मुलाच्या शिक्षणाच्या सुविधा, घरासाठी कर्ज इत्यादी साठी त्यांना संस्थेकडून सहकार्य या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. ज्या संस्थेमध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्ध असतात. तेथील कार्यालयीन कामे व्यवस्थित व यशस्वीपणे चालू राहतात. या व्यतिरिक्त अनेक गोष्टीचा परिणाम संस्थेच्या कामावर होताना दिसतो. उदा.संस्थेतील मनुष्यबळ, उत्पादन, इ. संस्थेत काम करणाया कर्मचायांचे एकमेकांशी पूर्ण सहकार्य हवे,तसेच अधिकारी वर्गाशी देखील चागंले सहसंबध असायला हवे.वरील सर्व गोष्टींचा विचार करता संस्थेला

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

तेथे काम कारणाया कर्मचायांशी निकटचा संबध येत असतो. त्यामुळे योग्य प्रकारचा संबध कर्मचायांशी प्रस्थापित करणे संस्थानी त्यांना योग्य न्याय देणे आवश्यक असते. म्हणजेच वरिष्ठ अधिकायांनी कर्मचायांच्या कामाचे कौतुक करणे, योग्य मोबदला देणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्थेचे काम हे चांगल्या प्रकारे चालेल. अशाच पदधतीने शैक्षणिक क्षेत्रात देखील संस्थेने शिक्षकांची काळजी घेतली तर विकास साधला जाऊ शकतो. परंतु संस्थेच्या कर्मचायांमध्ये काही गुणांची गरज आहे ती म्हणजे कामाची बांधिलकी होय. संस्थात्मक न्याय ही संकल्पना प्रत्येक ठिकाणी विचार केला गेला पाहिजे हा एकमेव उददेश्य !

- **संशोधन अभ्यासाची गरज**

भारताच्या संदर्भात संबधित साहित्याच्या सिंहावलोकनातून सूचीत होते की, शिक्षकांच्या व्यवसाय समाधान संबधित विदयार्थी आणि अध्ययनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यवसाय सहभाग सामाजिक आणि जनसंख्या मुल्ये शिक्षंकाची परिणामकारकता कार्यक्षमता आणि सक्षमता मानसिक सामाजिक परिपक्वता बर्नआऊट आणि निश्चित स्थान सामाजिक आर्थिक दर्जा सघंटनात्मक वातावरण आणि नेतृत्वशैली या बाबत महाविदयालीयन व विदयापीठ शिक्षक प्राथमिक आणि माध्यमिक शालेय शिक्षक तात्पूरत्या संबधाचे विदयापीठ शिक्षक तसेच निवासी व अनिवासी शालेय शिक्षकांवरती(भावनिक बुदधीमत्ता भूमिका सामर्थ्य दिशा प्रमुख व्यवसायसमाधाना)संशोधने झाले आहेत या पैकी बहूतेक संशोधने एम.एड एम.फील पीएचडी स्तरावर आढळून आले आहेत.

तसेच संस्थात्मक न्याय व व्यवसायीक समाधान या बाबत संशोधने कंपनी मध्ये झाले आहे. शिक्षण क्षेत्रात संशोधन झालेली आढळले नाही .व्यवसाय समाधान व बांधिलकी यावर थोडे संशोधन दिसुन आले म्हणून माध्यमिक स्तरावर हे संशोधन होणे गरजेचे आहे. या संशोधनामुळे संस्थेची आपल्या कर्मचारी प्रती कोणती जबाबदारी आहे व आपली भूमिका काय आहे.याची जाणीव निर्माण होण्यास मदत होईल व शिक्षकांला आपल्या व्यवसाय समाधान प्राप्त होईल व्यवसायिक बांधिलकीचा विकास घडेल.

संस्थात्मक न्याय ही पाश्चिमात्य संकल्पना असून भारतात यावर फारच कमी संशोधने झालेली आहेत परंतू व्यवसाय समाधानाचा व्यवसायिक बांधिलकी संस्थामत्क न्याय यांचा एकत्रित अभ्यास या संदर्भात संशोधने आढळून आलेली नाहीत म्हणून संशोधक सदर संशोधन करीत आहे.

- **संशोधन समस्या विधान** ः

"मुंबईतील माध्यमिक शाळेच्या शिक्षकांमधील संस्थात्मक न्याय, व्यवसाय समाधान आणि व्यावसायिक बांधिलकी यांच्या मधील सहसंबंधाचा अभ्यास"

**संशोधनातील चल** ः संबधित संशोधनासाठी खालील चलांचा समावेश करता येईल.

१. व्यावसायिक बांधिलकी (Professional commitment)
२. व्यवसाय समाधान (Job satisfaction)
३. संस्थात्मक न्याय (Organizational Justice)

- **कार्यकारी व्याख्या** ः

संशोधनाच्या उपयोगात आणलेल्या संकल्पनाच्या कार्यकारी व्याख्या खालीलप्रमाणे.

- **व्यवसायिक बांधिलकी** ः

विशिष्ट व्यवसाय किंवा संघटनेचा सदस्य राहण्याची शिक्षकांची इच्छा व तिचे स्वरूप तसेच व्यवसायासाठी व संघटनेसाठी कितीही प्रयत्न करण्याची प्रचंड इच्छाशक्ती म्हणजे व्यावसायिक बांधिलकी

होय.

- **व्यावसायिक समाधान ः**

शिक्षकांचे व्यावसायिक समाधान म्हणजे शिक्षकांच्या अपेक्षाचा त्यांच्या संस्थेतील पूर्त तेचे प्रमाण होय.यामध्ये पुढील बाबीचा समावेश होतो वेतन ,सुरक्षा, दर्जा, आंतरव्यक्ती संबध, पर्यवेक्षण धोरणे व प्रशासन, उपलब्ध सोयी, कामाचे स्वरूप व आवड, मान्यता संपादन, वाढत्या कामाची जबाबदारी व उच्च कामाची उपलब्ध संधी, म्हणजेच व्यवसायिक समधान होय. (घटोल कल्पना १९९९)

- **संस्थात्मक न्याय ः**

संस्थात्मक न्याय म्हणजे कर्मचायांचे तंटे किंवा तक्रारी सोडविण्यात संवादांचे नियोजन, सर्जनशीलतेच्या वृध्दीसाठी दिलेले प्रोत्साहन, निर्णयप्रक्रियेत असलेला सहभाग याबाबतीतील संस्थेचे धोरण व दिलेल्या न्यायाबद्दलच्या योग्यतेविषयीचे शिक्षकाचे मत म्हणजेच संस्थात्मक न्याय होय.

- **संशोधनाची ध्येय व हेतू ः**

संशोधनाची विशाल ध्येय पुढील प्रमाणे आहे. माध्यमिक शालेय शिक्षंकाच्या खालील चलाशी असलेल्या सहसंबधांचा अभ्यास करणे.

- व्यावसायिक बांधिलकी
- व्यवसाय समाधान
- संस्थात्मक न्याय
- **संशोधनाची उद्दिष्टे ः**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१ माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या संस्थात्मक न्यायासंबधीच्या प्राप्तांकाच व व्यवसाय समाधाना प्राप्तांकाचा परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

२ माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकी संबधीच्या प्राप्तांकाचा व संस्थात्मक न्याया प्राप्तांकाचा परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

३ माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी संबधीच्या प्राप्तांकाचा व व्यवसाय समाधाना प्राप्तांकाचा परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची परिकल्पना ः**

प्रस्तुत संशोधनातील शुन्य परिकल्पना पुढील प्रमाणे आहेत.

१ माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या संस्थात्मक न्यायासंबधीच्या प्राप्तांकाचा व व्यवसाय समाधाना प्राप्तांकाचा परस्पर संबंधाच्या संदर्भात लक्षणीय सहसंबध नाही.

२ माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकी संबधीच्या प्राप्तांकाचा व संस्थात्मक न्याया प्राप्तांकाचा परस्पर संबंधाच्या संदर्भात लक्षणीय सहसंबध नाही.

३ माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी संबधीच्या प्राप्तांकाचा व व्यवसाय समाधाना प्राप्तांकाचा परस्पर संबंधाच्या संदर्भात लक्षणीय सहसंबध नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ः**

प्रस्तुत संशोधनात फक्त मुंबईतील माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा समावेश केला आहे.प्राथमिक शाळा कनिष्ठ महाविदियालय आणि वरिष्ठ महाविदियालयातील शिक्षकांचा समावेश केला नाही.सदर संशोधनात मुंबईतील शाळेत कार्यरत असणा–या शिक्षकांचा समावेश केला आहे.मुंबईतील मराठी माध्यमांच्या शाळेतील शिकवणारे शिक्षक आहेत.अनुदानित व विनाअनुदानित शाळाचा समावेश करण्यात आला.संशोधनात मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळाचा समावेश करण्यात आला. पुर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च माध्यमिक व महाविदियालय शिक्षकांच्या समावेश करण्यात आला नाही. इंग्रजी, हिदी, उर्दू ,कन्नड, तामिळ, गुजराथी व अन्य भाषिक शाळाचा समावशे करण्यात आला नाही. तसेच पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिकां, प्रशिक्षक पदवीधर आहेत. निवड केलेल्या सर्व शाळा शहरी विभागातील आहेत.

संशोधनात माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संस्थात्मक न्याय व्यवसाय समाधान व व्यावसायिक बांधिलकी सहसंबंध अभ्यासला आहे.सदर संशोधन हे संख्यात्मक श्रेणीपद्धतीचे असून त्यातून गुणात्मक भाग वगळला आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती ः**

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधनातील सहसंबंध आणि कारणमीमांसा तुलनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला.

संशोधनातील विविध चलांशी पुरूष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची तुलना केली म्हणून कारणमीमांसा तुलनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला.

संशोधन अभ्यासात माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संस्थात्मक न्याय व्यवसाय समाधान आणि व्यावसायिक बांधिलकी यांच्या मधील सहसंबंधाचा अभ्यासला जाणार असून त्याकरिता सहसंबंधात्मक अभ्यास पद्धतीचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचे न्यादर्श ः**

प्रस्तुत संशोधनात मुंबईतील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील जवळपास ३१0 शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे.

नमुना निवडीसाठी त्रीस्तरीय नमुना तंत्राचा वापर करण्यात आला पहिल्या स्तरात मुंबईतील न्यादर्श नमुना निवड तंत्रातील लॉटरी पद्धतीने निवडण्यात आले.दुस–या स्तरात या प्रत्येक व्यवस्थापन प्रकारातील खाजगी अनुदानित व खाजगी विनाअनुदानित शाळांची निवड करण्यात आली आणि तिस–या स्तरात संशोधन संबधित शाळेतील शिक्षकांचा न्यादर्श नमुना म्हणून निवडयात आला.

**संशोधनाची साधने ः**

प्रस्तुत संशोधनात खालील साधनाचा वापर करण्यात आला.

१ घाटोळ(१९९७)यांची व्यवसाय समाधान मापन श्रेणी

२ व्यावसायिक बांधिलकीसाठी मापन करण्याकरिता श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदियापीठ मुंबई शिक्षण विभाग (१९९९)यांनी तयार केलेल्या मापन श्रेणी

३ संस्थात्मक न्याय मापन श्रेणी संशोधक निर्मित आहे.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

**माहिती विश्लेषण तंत्रे :**

प्रस्तुत संशोधनातील माहितीचे विश्लेषण करण्यासाठी खालील सांख्यिकी तंत्राचा वापर केला आहे.

अ) केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे
ब) विचलनशीलतेची परिमाणे
क) 'टी' परिक्षिका
ड) सहसंबंध गुणक
इ) झेड परिक्षिका
फ) बहूस्तरीय सहसंबंध

**संशोधनाचे महत्व :**

सदर संशोधन अभ्यासाच्या निष्कर्षातून असे अपेक्षित आहे.की माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संस्थात्मक न्याय व्यवसाय समाधान आणि व्यावसायिक बांधिलकी यांच्या मधील सहसंबंधाची माहिती होईल. संस्थाना स्वताची भूमिका समजल्याने त्यांच्यामध्ये सकारात्मक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातील शिक्षकांना व्यावसायिक बांधिलकीची जाणीव झाल्याने त्याची क्षमता व पात्रता समजण्यास मदत होईल. शिक्षकांचा दृष्टिकोन समजण्यास मुख्याध्यापकांना मदत होईल. त्यामुळे शिक्षकांची व्यवसाय समाधानात आपोआपच वाढ होईल.

संशोधन अभ्यासानंतर शिक्षकांची संस्थात्मक न्याय, व्यवसाय समाधान आणि व्यावसायिक बांधिलकी कशा प्रकारची आहे याची माहिती मिळेल व त्यामध्ये सकारात्मक सुधारणा करण्यासाठी शिक्षक प्रयत्न करतील.एकंदरित संशोधन अभ्यासमध्ये निष्कर्षावरून शिक्षकांच्या कार्यात विकासाची संभावना अपेक्षित आहे.

**परिकल्पनांचे परीक्षण**

**शून्य परिकल्पना १**

**माध्यमिक शालेतील शिक्षकांच्या संस्थात्मक न्यायासंबधीच्या प्राप्तांकाचा व व्यवसाय समाधाना प्राप्तांकाचा परस्पर संबंधाच्या संदर्भात लक्षणीय सहसंबध नाही.**

**सारणी क्र.१**

१ माध्यमिक शालेतील शिक्षकांची संस्थात्मक न्याय
व व्यवसाय समाधाना यातील सहसंबंध

| नमुना | स्वाधीनता मात्रा | कोष्टकीय 'r' | | सहसंबध गुणक | सार्थकता स्तर | प्रसरण १00 $r^2$ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ०.०५ | ०.०१ | | | |
| ३१0 | ३0८ | ०.०९८ | ०.१२८ | ०.६३१ | ०.०१स्तरावर लक्षणीय आहे | ३९.८१% |

**सहसंबंध गुणकाचे अर्थनिर्वचन**

कोष्टकीय 'r' ची किंमत ०.०५ स्तरावर ०.०९८ तर ०.०१ स्तरावर ०.१२८ आहे तर प्राप्त 'r'ची किंमत ०.६३१ आहे. ही किंमत 'डी' कोष्टकातील ०.०५'r'च्या किंमतीपेक्षा जास्त असल्यामुळे ०.०५स्तरावर

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

लक्षणीय सहसंबंध आहे. यावरून असे म्हणता येईल की माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची संस्थात्मक न्याय व व्यवसाय समाधान यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. ही परिकल्पना ०.०१ स्तरावर त्याज्य ठरते.

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची संस्थात्मक न्याय व व्यवसाय समाधान यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे.हा सहसंबंध उच्च संबंध व धन स्वरूपाचा आहे.शिक्षकांच्या संस्थात्मक न्याय प्राप्तांकाचे ३१.८१% विचलन व्यवसाय समाधानाशी संबंधित आहे.

**निष्कर्ष**

१. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची संस्थात्मक न्याय व व्यवसाय समाधान यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. हा संहसंबंध फारच उच्च व धन स्वरूपाचा आहे. ज्या शिक्षकांची व्यवसाय समाधान जास्त असेल त्या शिक्षकांचे संस्थात्मक न्याय जास्त असेल.

यातून असे सुचित होते की ज्या शिक्षकांमध्ये व्यवसाय समाधान जास्त असेल त्याचे संस्थात्मक न्याय जास्त असेल.शिक्षकांमध्ये व्यवसाय समाधान जास्त असल्यास इतर सहकार्यासोबत समायोजन करू शकतो.व्यवसायातील वर्तन योग्य असू शकते योग्य प्रकारे सहकार्य, अधिक मदत, वेळच्या वेळी पगार, प्रेरणा, प्रोत्साहन त्यामुळे कामाचे उत्साह वाढतो म्हणून शिक्षकाचे संस्थात्मक न्याय ही जास्त असण्याची शक्यता आहे. म्हणजेच ज्या शिक्षकांची व्यवसाय समाधान जास्त असेल त्या शिक्षकांचे संस्थात्मक न्याय जास्त असेल.संस्थात्मक न्याय हे शिक्षकांच्या व्यवसाय समाधानावर आधारीत असतात शिक्षकांच्या व्यवसाय समाधान चांगले असेल तर त्या संस्थात्मक न्याय हे अधिक चांगले असण्याची शक्यता आहे.

**माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकी संबधीच्या प्राप्तांकाचा व संस्थात्मक न्याया प्राप्तांकाचा परस्पर संबंधाच्या संदर्भात लक्षणीय सहसंबध नाही.**

**सारणी क.२**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांची व्यवसायिक बांधिलकी
व संस्थात्मक न्याय यातील सहसंबंध

| नमुना | स्वाधीनता मात्रा | कोष्टकीय ‘r’ | | सहसंबध गुणक | सार्थकता स्तर | प्रसरण १00 $r^2$ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ०.0५ | ०.0१ | | | |
| ३१0 | ३0८ | ०.0९८ | ०.१२८ | ०.६१६ | ०.0१ स्तरावर लक्षनीय आहे | ३७.९४% |

**सहसंबंध गुणकाचे अर्थनिर्वचन** :

कोष्टकीय ‘r’ ची किंमत ०.0५ स्तरावर ०.0९८ तर ०.0१ स्तरावर ०.१२८ आहे तर प्राप्त ‘r’ची किंमत ०.६१६ आहे. ही किंमत ‘डी’कोष्टकातील ०.0१ स्तरावर लक्षणीय सहसंबंध आहे. यावरून असे म्हणता येईल की माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी व संस्थात्मक न्याय यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. ही परिकल्पना ०.0१ स्तरावर त्याज्य ठरते.

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची व्यवसायिक बांधिलकी व संस्थात्मक न्याय यांच्यामध्ये लक्षणीय

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

सहसंबंध आहे.हा सहसंबंध उच्च संबंध व धन स्वरूपाचा आहे.शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकी प्राप्तांकाचे ३७.९४% विचलन संस्थात्मक न्यायशी संबंधित आहे.

**निष्कर्ष**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांची व्यवसायिक बांधिलकी व संस्थात्मक न्याय यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. हा संहसंबंध फारच उच्च व धन स्वरूपाचा आहे. ज्या शिक्षकांची संस्थात्मक न्याय जास्त असेल त्या शिक्षकांचे व्यवसायिक बांधिलकी जास्त असेल.

यातून असे सुचित होते की ज्या शिक्षकांमध्ये संस्थात्मक न्याय जास्त असेल त्याचे व्यावसायिक बांधिलकी जास्त असेल शिक्षकांमध्ये संस्थात्मक न्याय जास्त असल्यास व्यक्तीच्या अंगी असलेली कौशल्ये क्षमता यांचा पुरेपुर वापर करू शकतो. शिक्षक प्रशिक्षणाच्या महाविदयालयातून निर्माण झालेली विदयार्थी प्रती बांधिलकी योग्य असू शकते. त्यामुळे ज्या गोष्टीसाठी त्या व्यक्तीने प्रशिक्षण घतले आहे त्या गोष्टी करण्याची संधी मिळाली असल्याने कामाचे उत्साह वाढतो म्हणून शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी ही जास्त असण्याची शक्यता आहे.शिक्षकांच्या संस्थात्मक न्याय चांगले असेल तर त्या व्यावसायिक बांधिलकी हे अधिक चांगले असण्याची शक्यता आहे.

**माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संबधीच्या व्यवसाय समाधाना प्राप्तांकाचा व व्यावसायिक बांधिलकी प्राप्तांकाचा परस्पर संबंधाच्या संदर्भात लक्षणीय सहसंबध नाही.**

**सारणी क्र. ३**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांची व्यवसाय समाधान
व व्यवसायिक बांधिलकीच्या यातील सहसंबंध

| नमुना | स्वाधीनता मात्रा | कोष्टकीय ‘r’ | | सहसंबध गुणक | सार्थकता स्तर | प्रसरण १०० $r^2$ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ०.०५ | ०.०१ | | | |
| ३१० | ३०८ | ०.०९८ | ०.१२८ | ०.६१३ | ०.०१ स्तरावर लक्षनीय आहे. | ३७.५७% |

**सहसंबंध गुणकाचे अर्थनिर्वचन ः**

कोष्टकीय ‘r’ ची किंमत ०.०५ स्तरावर ०.०९८ तर ०.०१ स्तरावर ०.१२८ आहे तर प्राप्त ‘r’ची किंमत ०.६१३ आहे. ही किंमत ‘डी’कोष्टकातील ०.०१ स्तरावर लक्षणीय सहसंबंध आहे. यावरून असे म्हणता येईल की माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची व्यवसाय समाधान व व्यावसायिक बांधिलकी यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. ही परिकल्पना ०.०१ स्तरावर त्याज्य ठरते.

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची व्यवसाय समाधान व व्यावसायिक बांधिलकी यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे.हा सहसंबंध उच्च संबंध व धन स्वरूपाचा आहे.शिक्षकांच्या व्यवसाय समाधान प्राप्तांकाचे ३७.५७% विचलन व्यावसायिक बांधिलकीशी संबंधित आहे.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

**निष्कर्ष**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांची व्यवसाय समाधान व व्यावसायिक बांधिलकी यांच्यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. हा संहसंबंध फारच उच्च व धन स्वरूपाचा आहे. ज्या शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी जास्त असेल त्या शिक्षकांचे व्यवसाय समाधान जास्त असेल.

यातुन असे सुचित होते की ज्या शिक्षकांमध्ये व्यावसायिक बांधिलकी जास्त असेल त्याचे व्यवसाय समाधान जास्त असेल शिक्षकांमध्ये व्यावसायिक बांधिलकी जास्त असल्यामुळे उच्च शिक्षित शिक्षक असल्यास त्याच्या अर्हतेनुसार वेतन श्रेणीत वाढ केली असावी म्हणुन उत्तम शिक्षणाची कास धरली जाईल व संपादन प्रेरणा ही वाढेल शिक्षकामध्ये वाढली असेल.व्यवसाय समाधानात वेतन ,सुरक्षा, दर्जा, आंतरव्यक्ती संबध, पर्यवेक्षण धोरणे व प्रशासन, उपलब्ध सोयी, कामाचे स्वरूप व आवड, मान्यता संपादन, वाढत्या कामाची जबाबदारी व उच्च कामाची उपलब्ध संधी असल्याने त्यांच्या व्यवसायिक बांधिलकीत वाढ होत असेल व्यावसाय समाधान हे शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी वर आधारित असतात. शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी चांगले असेल तर त्या व्यावसाय समाधान हे अधिक चांगले असण्याची शक्यता आहे.

**प्रमुख शिफारशी :**

१. शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकी व्यवसाय समाधान संस्थात्मक न्याय यात वाढ करण्यासाठी विविध घटकांकडून किंवा माध्यमाव्दारे प्रयत्न करण्याची गरज आहे.

२. शिक्षकांचे व्यवसाय समाधानात वाढ करण्यासाठी त्यांना नोकरीची हमी शासकीय नियमा नुसार वेतन व इतर सोयी उपलब्ध करून दयाव्यात.

३. संस्थात्मक न्याय चांगले राहण्यासाठी शाळेत भौतिक सुविधा आवश्यकतेनुसार उपलब्ध करून दयाव्यात.

४. शिक्षकांत व्यावसायिक बांधिलकी अधिक प्रमाणात वृदधींगत होण्यासाठी शिक्षकीपेशाचे महत्व पटवून देणे.

५. शिक्षकांना शाळेतील निर्णय प्रकियेत सामावून घ्यावे त्यांच्या चांगल्या स्व कल्पनाचे स्वागत करावे.

६. शिक्षकांना उच्चशिक्षण व्यावसायिक वृदधीसाठी प्रोत्साहीत करून त्यांना योग्यती मदत करण्यात यावी.

**पुढील संशोधनासाठी सुचना :**

१ माध्यमिक शालेय शिक्षकांचे जीवन कौशल्य, भूमिका सामर्थ्याचा त्यांच्या व्यवसाय समाधानाशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास.

२ माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा व्यावसायिक बांधिलकी त्याची प्रेरणा आत्मभान आणि शिक्षक व्यक्तीमत्व यातील सहसंबंधाचा अभ्यास

३ विभिन्न स्तरावरील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा दर्जा व्यावसायिक पाश्वभूमी व्यावसायिक तणाव आणि संस्थात्मक न्याय यातील सहसंबंधाचा अभ्यास

४ माध्यमिक शालेय शिक्षकाचे व्यवसाय समाधानाचा त्यांची व्यावसायिक बांधिलकी शिक्षण परिणामकारकता आणि सामाजिक आर्थिक दर्जा यातील सहसंबंधाचा अभ्यास

५ माध्यमिक शालेय शिक्षकांचे जीवन कौशल्य, भूमिका सामर्थ्याचा त्यांच्या व्यवसाय समाधानाशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – III October 2016

## संदर्भ ग्रंथ यादी

### पुस्तके

भिंताडे वि.रा. (१९९९).शैक्षणिक संशोधन पद्धती (द्वितीयवृत्ती )पुणे नूतन प्रकाशन
मुळे,रा.व उमाठे,वि (१९९८),शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (तृतीयवृत्ती),औरंगाबाद : विद्या बुक्स.
पंडित व,वि. (१९८९),शिक्षणातील संशोधन अभिकल्प (प्रथमावृत्ती),पुणे :नुतन प्रकाशन.
पाटील वा. भा (१९९९).संशोधन पद्धती.नागपूर :मगेश प्रकाशन.
पारखी.मे.बोद्रे.अ. (२००६)संघटनात्मक वर्तन नागपूर : मंगेश प्रकाशन.
मस्के टी.ए. (१९८८) शैक्षणिक संख्याशास्त्र (प्रथमावृत्ती).पुणे : प्रज्ञा प्रकाशन.
कदम चा.प. (१९८९).शैक्षणिक संख्याशास्त्र पुणे नूतन प्रकाशन
शर्मा आय ए. द्ययावसायिक निर्देश तथा परामर्श (पहिली आवृत्ती)मेरठ : सुर्या पब्लीकेशन .मधुकर इंदिरा.
तावडे रने.व.शिंदे (२०००).माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण व्यवस्थापन समस्या व उपाय प्रथमावृत्ती पुणे डायमंड प्रकाशन.
Best, J.and Kahn,J.W. ¼ 2003 ½ Research in Education (7th Ed.).New Delhi:prentice-Hall of India Pvt.Ltd.
Buch,M.B. ¼ 1991 ½ -Fourth Survey of Research in Education.Vol.1 New Delhi: NCERT.
Buch,M.B. ¼ 1992 ½ -Fifth Survey of Research in Education.Vol.1 New Delhi: NCERT.
Garrett,H.E¼ 1985½ Statistics in Psychology and Education (11th Ed.)Vakil,Feffer and Simsons Ltd
Kothari,C.R.(1985).Research Methodology method and techniques.New Delhi:Wily Easter Ltd.

### ज्ञानकोष व शब्दकोष.

Guthrie,J.W.Eneyclopedia of Education (2nd Ed).P.C.M.
MacMillan,(1930)the Encyclopedia of Social Sciences (Vol.IX).
सोहोनी.श.कृ (१९९३).शैक्षणिक दीपाकोश (प्रथमावृत्ती).पुणे : सुधा सोहोनी.
Good,C.V.Dictionary of Education(2nd Ed,).New York:Mac Graw Hill.
Oxford.(1952).The Advanced Learner's Dictionary of Current English.
मगर (२००८).“माध्यमिक शालेतील शिक्षकांचा व्यवसाय समाधान व व्यावसायिक तणाव यांमधील सहसंबंधाचा अभ्यास ”एम फिल.शोधनिबंध शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.
देवरे (२००८)“माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाच्या त्यांचा भावनिक बुदधीमत्ता ,भुमिका सामर्थ्ये आणि दिशाप्रमुख्याशी सहसंबधाचा अभ्यास” पी.एचडी शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.
सुजाता डुकरे(२०१४)“ माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा त्यांच्या संघटनात्मक वातावरणाशी सहसंबंधाचा अभ्यास” शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.
मगर ज्ञानेश्वर (२०१४)“माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा त्यांची व्यावसायिक बांधिलकी, संघटनात्मक स्वास्थ्य आणि संघटनात्मक नागरीकत्व वर्तन यातील सहसंबंधाचा अभ्यास”पी.एचडी शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.
David Dude – organization commitment of principles the effects of Job autonomy empowerment and distributive justice ir vlowa edulcgilview content cgi ? drticle 3233 ? context =etd. . retrieved on 17th june, 2013.
Ghatol .K (1999)“ A study of teacher performance and job satisfaction of teacher in Relation to their Maturity Locus of contorol and organistional conffict” unpublished Ph.D. Disseration S.N.D.T womens university.
गोन्सलविस फेलिसीडा प्राथमिक शिक्षकाच्या व्यावसायिक समाधानाचा चिकित्सक अभ्यास एस.एन.डी.टी. महिला विदयापीठ मुंबई.